**आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांचे आयोजन करणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य देण्याबाबतचे धोरण.**

**महाराष्ट्र शासन**
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक - आंचिम-२०११/प्र.क्र.१५८/सां.का.१
मंत्रालय (विस्तार), मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - १८ ऑक्टोबर, २०१२.

प्रस्तावना : पुणे फिल्म फाउंडेशन, मुंबई अकॅडमी ऑफ मुव्हिंग इमेजेस, आणि आशियाई फिल्म फाउंडेशन या संस्थांकडून आयोजित अनुक्रमे पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, मामि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आणि थर्ड आय एशियन चित्रपट महोत्सवांसाठी शासन सहाय्यक अनुदान मंजूर करते. अशा प्रकारच्या चित्रपट महोत्सवांसाठी निधीची मागणी विविध संस्थांमार्फत होत असते. त्यास अनुलक्षून आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांचे आयोजन करणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय : आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या आयोजनार्थ शासनामार्फत सद्य:स्थितीत ज्या तीन संस्थांना अर्थसहाय्य दिले जाते त्याव्यतिरिक्त पुढीलप्रमाणे 'प्रथम येणाऱ्यास प्रथम' या तत्वावर विहीत निकषांची पूर्तता करणाऱ्या, जास्तीत जास्त १० संस्थांना प्रत्येकी अधिकतम रुपये ५.०० लाख याप्रमाणे सहाय्यक अनुदान मंजूर करण्यात येईल.

१. हे अर्थसहाय्य निधीच्या उपलब्धतेनुसार मंजूर केले जाईल.
२. आयोजन संस्था धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे किमान ३ वर्षापूर्वी नोंदणीकृत असावी. संस्थेने लिखित घटना प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक राहील.
३. लघुपट, माहितीपट, ॲनिमेशनपट तसेच पूर्ण लांबीचे चित्रपट यांचा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव तसेच निव्वळ मराठी चित्रपटांचा महोत्सव आयोजित करणाऱ्या संस्थांना सदर अनुदान अनुज्ञेय राहील. आयोजन संस्थेचे उद्दीष्ट हे चित्रपट कलेचा प्रसार, प्रचार, संवर्धन आणि त्यामाध्यमातून कला व संस्कृतीचे प्रदर्शन तसेच ओळख / माहिती करुन देणे हे असावे.
४. संस्थेने प्रस्तावासोबत चित्रपट आयोजनाबाबतचे नेमके उद्दीष्ट विषद करणे आवश्यक राहील. विविध विषयांवरील, नाविन्यपूर्ण मांडणी असलेले चित्रपट, आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय / राज्य स्तरावर नावाजलेले किंवा पुरस्कार प्राप्त दर्जेदार चित्रपट सामान्य जनतेपर्यंत नेऊन त्यांची अभिरुची वाढविणे या उद्देशाने चित्रपट महोत्सवाचे आयोजन होणे आवश्यक राहील.
५. आयोजन संस्था ना नफा ना तोटा या तत्वावर कार्यरत असावी.
६. सदर संस्थेने त्यांच्या किमान ३ वर्षाच्या कार्याचा अहवाल शासनाकडे सादर करावा.
७. संस्थेने चित्रपटविषयक कार्यशाळा, चर्चासत्र इ. चे स्वतंत्रपणे आयोजन करणे आवश्यक राहील संस्थेने महोत्सवासंदर्भात छापून आलेल्या जाहिराती, लिखित साहित्य, वृत्तपत्रीय कात्रणे, छायाचित्रे इ. पुरावे सादर करणे आवश्यक राहील.
८. संस्थेने मागील ३ वर्षाचे सनदी लेखापालाचे लेखा विषयक अहवाल शासनास सादर करणे आवश्यक राहील.
९. चित्रपट महोत्सवात प्रदान करण्यात येणाऱ्या पुरस्कार / सन्मान समितीवर शासनाचा किमान एक प्रतिनिधी संस्थेने नेमणे आवश्यक राहील.
१०. चित्रपट महोत्सवाची जाहिरात, निमंत्रणपत्रिका इ. माध्यमातून **"सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या सहयोगाने"** असा ठळक उल्लेख करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाचा सहयोग महोत्सवाशी संबंधित सर्वांना तसेच प्रसार माध्यमांना देखील स्पष्टपणे समजेल, अशा पध्दतीने आयोजकांनी महोत्सवपूर्व व महोत्सवादरम्यान विशेषत्वाने अधोरेखित करावा.

११. चित्रपट महोत्सवातील निवडलेले चित्रपट अभिरूचीपूर्ण आणि दर्जेदार असणे याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील. चित्रपट महोत्सवात दर्जेदार मराठी चित्रपटांच्या महोत्सवासाठी विशेष विभाग असावा.

१२. चित्रपट महोत्सवाचे प्रस्ताव संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत सादर होणे आवश्यक राहील. संचालक सांस्कृतिक कार्य यांनी त्यांच्या स्तरावर एक छाननी समिती नेमून प्राप्त प्रस्तावाची छाननी करून प्रस्ताव त्यांच्या अभिप्राय आणि शिफारशींसह शासनास सादर करणे आवश्यक राहील.

१३. चित्रपट महोत्सवासाठी निधीची मागणी करणारी संस्था उपरोल्लेखित सर्व बाबींची पूर्तता करीत असल्याबाबत संचालक, सांस्कृतिक कार्य यांचे अभिप्राय आवश्यक राहतील.

१४. चित्रपट महोत्सवाच्या आयोजनार्थ अर्थसहाय्याबाबत शासनाचा निर्णय अंतिम राहील.

१५. चित्रपट महोत्सवाच्या समारोपानंतर किमान ३ महिन्यात उपयोगिता प्रमाणपत्र, जमाखर्चाचा तपशिल (Profit and Loss Account) व खर्चाचा ताळेबंद (Balance Sheet) सादर करणे बंधनकारक असेल.

२. यासाठी होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडडी-२ २२०५, कला व संस्कृती (००) १०२, कला संस्कृति प्रचालन, (०३) (०६) आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (२२०५ १५८१), ५० इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली त्या त्या वर्षी उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात येईल.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. ३५७/१२/व्यय-१४, दि.१.८.२०१२ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सांकेतांक क्र. 201212141505378023

( कि. रा. कुलकर्णी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मुख्यमंत्री, यांचे सचिव मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई.
ग्रंथालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) एक / दोन - महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
महालेखापाल (लेखा परिक्षा) एक / दोन - महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ( ५ प्रती - प्रसिध्दीकरीता)
मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग (व्यय-१४), (अर्थसं.-११) मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग,
निवड नस्ती - सां.का.१

E:\data\Dhulam\INTERNATIONAL FILM FESTIVAL POLICY.doc